# अर्थनाद


संपादक

**डॉ आस्तीक टी.मुंगमोडे**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री ज्ञानेश महाविद्यालय,
नवरगाव, जि. चंद्रपूर





mahi Publication

# अनुक्रमाणिका


| अनु. क्र. | प्रकरणाचे नाव | लेखकाचे नाव | पेज नंबर |
|---|---|---|---|
| | आंतर्राष्ट्रीय व्यापार व प्रादेशिक गटांचा उदय | | |
| 1 | चीनच्या अर्थव्यवस्थेचे जागतिक व्यापार संघटनेतील शक्ती प्रदर्शन व अमेरिकेची अस्वस्थता | डॉ राजू श्रीरामे देवग्राम, नागपुर | 1-19 |
| 2 | "आंतरराष्ट्रीय व्यापारात प्रादेशिक गटाची आवश्यकता व भूमिका" | डॉ. प्राची दिलीप देशपांडे, नागपूर | 20-22 |
| 3 | दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (सार्क) :एक दृष्टीक्षेप South Asian Association for Regional Cooperation (SAARC): An Overview | डॉ.सुनिल कृष्णराव शिंदे भिवापूर | 23-29 |
| 4 | सार्क सफटा आणि भारत | डॉ. प्रशांत हरमरकर तिवासा | 30-42 |
| 5 | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि प्रादेशिक गटांचा उदय | डॉ. डी. एस. गुर्जर वर्धा | 43-49 |
| 6 | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि प्रादेशिक गटांचा उदय (The rise of Internatonal trade and regional groups) | Sudhakar Kambale Research Scholars Amravati | 50-53 |
| 7 | आंतरराष्ट्रीय व्यापार आणि प्रादेशिक गटाचा उदय | प्रा. डॉ. सी.पी. साखरवाडे जवाहरनगर, भंडारा | 54-56 |
| 8 | भारताच्या परकीय व्यापारातील प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुकीचे विवेचन | डॉ.नितीन चौधरी अकोला | 57-61 |
| 9 | जागतिक व्यापार संघटनेचा भारतीय कृषीत वरील परिणाम | डॉ.श्रीकृष्ण भुटे अड्याळ, जि.भंडारा | 62-68 |
| 10 | Impact of Covid-19 pandemic on International Trade and Rising Regional Disparities with special Reference to India | *Rajendra Motghare, Nagpur Dr. Sanjay Dhanwate Karanja* | 69-76 |

This book is sold subject to the condition that it shall not, by way of trade or otherwise, be lent, resold, hired out, or otherwise circulated without the publisher's prior written consent in any form of binding or cover other than that in which it is published and without a similar condition including this condition being imposed on the subsequent purchaser and without limiting the rights under copyright reserved above, no part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system, or transmitted in any form or by any means (electronic, mechanical, photocopying or recording) otherwise without the prior written permission of both the copyright owner and the above-mentioned publisher of this book.

Inquiries for bulk sales may be solicited at mahibookpublication@gmail.com

First Edition: 2022

ISBN: 978-93-94238-24-4

Price : RS. 699/-

**Mahi Publication**
Office No.1, Krishnasagar Society,
Nr. Shivsagar sharda Mandir Road, Ahmedabad-380007
Phone: +(91) 798 422 6340
Website : www.mahipublication.com
E-mail: mahibookpublication@gmail.com

Copyright © 2022\ MAHI PUBLICATION

# दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना (सार्क) : एक दृष्टीक्षेप

**डॉ. सुनिल कृष्णराव शिंदे**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर
जि. नागपूर.

सारांश **(Summary)**
प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारत सहभागी असलेल्या प्रादेशिक संघटनापैकी एक प्रमुख संघटना मध्ये महत्वाचे स्थान असलेल्या दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना ज्याला सक्षेपाने सार्क असे म्हटले जाते. या सार्क संघटनेच्या विविध पैलुवर सविस्तर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दक्षिण आशियाई देशांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्थितीची माहिती देण्याच्या प्रयत्नासोबतच प्रादेशिक सहकार्य संघटना स्थापन करण्यामागची आशियाई देशांची भूमिका व पार्श्वभूमी, भारत सहभागी असलेल्या विविध प्रादेशिक संघटनाबद्दल थोडक्यात माहिती व विश्लेषण विविध प्रादेशिक संघटनांच्या निर्मितीस जबाबदार असलेले प्रमुख घटक इत्यादी माहिती अंतर्भुत करण्यात आलेली आहे. तसेच शोधनिबंधाचा मुख्य विषय 'दक्षिण आशियाई सहकार्य संघटना' म्हणजेच 'सार्क' असल्यामुळे आशियाई देशांना एकत्रित येवून सार्क या संघटनेची स्थापना करण्याची गरज का निर्माण झाली म्हणजेच संघटनेच्या स्थापनेची महत्वाची पार्श्वभूमी, सार्कच्या स्थापनेला दक्षिण आशियाई देशांमध्ये असलेले पुरक वातावरण व परिस्थिती, सार्क संघटना स्थापना करण्यामागची सार्कच्या जाहिरनाम्यात दिलेली उद्दिष्टे, सार्क संघटनेची आधारभूत तत्वे, सार्क वेगवेगळ्या क्षेत्रात करीत असलेल्या कार्यक्षेत्राची माहिती , सार्कचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी स्थापन केलेल्या विशेष व महत्वाच्या संस्था, सार्कमध्ये सहभागी राष्ट्रांचे एकूण जागतिक स्तरावरील स्थान, सार्कने स्थापनेपासून तर आजपर्यंत केलेली उल्लेखनिय कामगिरी, सार्कच्या अपयशाची कारणमिमांसा, सार्कसमोरील समस्या व आव्हाणे आणि सार्कच्या यशस्वी वाटचालीसाठी सुचविलेल्या उपाययोजनांचा समावेश आहे

➢ प्रस्तावना **(Introduction)**

दक्षिण आशियाई देशांमध्ये अफगानिस्तान, भारत, बांगलादेश, भूतान, नेपाळ, मालदीव, श्रीलंका आणि पाकिस्तान हे आठ देश येतात. भौगोलिक दृष्ट्या दक्षिण आशिया एकत्रित व सलग भूभाग असून विषुववृतच्या उत्तरेस वसला आहे. दक्षिण आशियाची उत्तरेकडील सिमा हिमालय पर्वतरागांनी बनली असून दक्षिणेस तिन्ही बाजुला हिंदी महासागर आहे. हा प्रदेश समशितोष्ण हवामानात येतो त्यामुळे येथिल पर्जन्य व हवामान, मातीचा पोत, जंगल झाडे व फुले, पिकांच्या जाती व शेतीची वैशिष्ट्ये विकसित झालेली आहे. आणि त्यामुळे दक्षिण आशियाई जनतेचे राहणिमान व जीवनमान विकसित झालेले आहे. सामाजिक दृष्ट्या दक्षिण आशियाई प्रदेशात अनेक वंश जाती, धर्म व पंथ, भाषा, वेषभुषेचे प्रकार, चालीरीती व परंपरा निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे दक्षिण आशियात अनेक प्रकारची विविधता दिसते. परंतु या विविधतेही समिश्र सांस्कृतिक एकतेचा आणि समग्र आध्यात्मिक जीवनसृष्टीचा एक सशक्त धागा या प्रदेशाला एकत्र जोडतो. या प्रदेशातील देश आर्थिकदृष्ट्या एकमेकांशी बांधलेले असून त्यांची अर्थव्यवस्था भौगोलिक समिपतेमुळे परस्परांना पुरक झाली आहे. दक्षिण आशियातील देशांनी इतिहासात युध्दे, परकीय आक्रमणे,

वसाहतवादाची प्रचंड झळ सोसली असून त्याविरुध्द प्रखर संघर्षसुध्दा अनुभवला आहे. स्वातंत्र्यानंतर या देशांना सारख्याच आर्थिक, सामाजिक व राजकीय समस्यांनी ग्रासले आहे. जागतिक पातळीवर हे देश विकसनशिल देश म्हणून गणले जातात. जगातिल समृध्द व बलाढ्य देशांच्या सत्तेच्या खेळात हे देश नगण्य ठरले असून नेहमीच दुर्लक्षित राहिले. अशा समदुःखीपणामुळे हे देश आपल्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी एक समान व्यासपीठ शोधत होते. ते त्यांना 1985 मध्ये सार्कच्या स्थापनेमुळे मिळाले.

➢ प्रादेशिक सहकार्य संघटनांची पार्श्वभूमी **(Background of Regional Cooperation Associations)**

युरोपीय आर्थिक समुदायाची स्थापना 1957 मध्ये आणि युरोपीय अनुउर्जा समुदायाची स्थापना 1958 मध्ये झाली. आशियामध्ये 1960 च्या सुमारास प्रादेशिक सहकार्याच्या संकल्पनेचा प्रसार झाला. 1960 मध्ये आर्थिक निकषावर आधारलेल्या प्रादेशिक संघटना उदयास आल्या. 1967 मध्ये एशियनची स्थापना झाली. नाटो सारख्या काही संघटनांनी संरक्षणाच्या बाबीवर लक्ष केंद्रीत केले. शीतयुध्दोत्तर काळात प्रादेशिक संघटनांनी व्यापारावरही लक्ष देण्यास सुरवात केल्यामुळे या काळात अनेक व्यापारी गट निर्माण झालेले दिसून येतात. अनेक देश मिळून आपले आर्थिक हितसंबंध दृढ करण्याकरीता निर्माण केलेल्या गटाला व्यापारी गट म्हणतात. सामान्यतः जकात (आयातीवरील कर) आणि कोटा (आयातीच्या प्रमाणावर घातलेल्या मर्यादा) व्यापारातील अडथळ्यांना कमी अथवा दुर करण्यासाठी केले जाणारे प्रादेशिक करार आहेत.

➢ भारत सहभागी असलेल्या प्रादेशिक सहकार्य संघटना

सार्क**: (SAARC)** 1985 मध्ये स्थापना, भारत, बांगलादेश, भूतान, नेपाळ, मालदीव व श्रीलंका, पाकिस्तान व अफगानिस्तान सहभागी देश

साफ्टा**:** ( SAFTA) इस्लामाबाद येथे भरलेल्या 12 व्या सार्क परिषदेमध्ये (4-6जानेवारी-2004) ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर सदस्य राष्ट्रांनी सह्या केल्यानंतर दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. 1 जानेवारी 2006 पासून साफ्टा ची कार्यवाही सुरु झाली. या साफ्टाने 'साप्टा' ची जागा घेतली.

बिमस्टेक**: 'बिमस्टेक'** (BIMSTEC) ही एक उपविभागीय प्रादेशिक **संघटना** आहे. या प्रादेशिक संघटनेचे एकूण सात सदस्य देश आहेत. यामध्ये सार्क **संघटनेचे** सदस्य असणाऱ्या भारत, नेपाळ, भूतान, बांग्लादेश आणि श्रीलंका या पाच देशांचा आणि 'आसियान' या व्यापारी गटाचे सदस्य असणाऱ्या म्यानमार आणि थायलंड या दोन देशांचा समावेश आहे.

ब्रिक्स**: "ब्रिक्स"** (BRICS ) हे भारत, ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या देशांच्या शिखर संघटनेचे संक्षिप्त नाव आहे. सुरूवातीला फक्त चार **देश** या संघटनेचे **सदस्य** होते आणि "ब्रिक" या संक्षिप्त नावाने ओळखले जात होते. 2010 मध्ये दक्षिण आफ्रिका समाविष्ट झाल्यावर संघटनेचे नाव **ब्रिक्स** झाले.
सांघाय सहकार्य संघटना**:** 2001 मध्ये चीन, रशिया, कझाकीस्तान, किरगीझस्तान, ताजीकिस्तान आणि उझबेकिस्तान या देशांनी एकत्र येवून स्थापन केलेली संघटना. 2016 मध्ये भारत आणि पाकिस्तान या संघटनेचे सभासद झाले.

**जी-20:** युरोपीय युनियन आणि 19 इतर राष्ट्रांची सरकारे आणि मध्यवर्ती बँकाचे गव्हर्नर यांचे 1999 मध्ये जी-20 नावाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करण्यात आले. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या

दरम्यान चर्चा करण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. भारताने जी-20 मध्ये सातत्याने सक्रिय सहभाग घेतला आहे.

➢ प्रादेशिक संघटनांच्या निर्मितीस जबाबदार घटक (**Factors responsible for the formation of regional organizations**)

1) प्रादेशिकवाद हा आंतरराष्ट्रीय संबंधाचा महत्त्वपूर्ण पैलू आहे.
2) एखादी प्रादेशिक संघटना निर्माण करण्यासाठी अथवा त्याचा भाग होण्यासाठी अनेक देश एकत्र येतांना दिसतात.
3) अशा संघटना समान आर्थिक, सामाजिक, राजकीय आधारलेल्या असू शकतात.
4) प्रादेशिक संघटना बांधतांना देशांनी भौगेलिकरीत्या जोडलेले महत्वाचे आहे.
5) भौगोलिक क्षेत्रातील दळणवळण आणि संपर्क व्यवस्था, उर्जास्त्रोत, आरोग्य व्यवस्था या बाबी त्यास पोषक असतात.
6) प्रादेशिकवादाची सुरवात सदस्यामध्ये घडणा-या राजकीय संवादाने होते. विचारविनीमयाची प्रक्रिया पुढे नेण्यासाठी समान विचारसरणी किंवा आर्थिक हितसंबंध उपयोगात येवू शकतात.

➢ सार्कच्या स्थापनेची पार्श्वभूमी (**Background of the establishment of SAARC**)

'प्रादेशिक सहकार्यातून विकास' या कल्पनेची अंमलबजावणी आधुनिक काळात पहिल्यांदा युरोपात केली गेली. दुस-या महायुद्धानंतर उद्ध्वस्त पश्चिम युरोपमध्ये पहिल्यांदा 'युरोपियन कोळसा आणि पोलाद महासंघ' आणि नंतर 1957 मध्ये 'युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटी'ची स्थापना झाली. त्याचेच रुपांतर पुढे सध्याच्या 'युरोपियन युनियन'मध्ये झाले. युरोपियन प्रयोग इतका यशस्वी झाला की, त्याच प्रकारचे मॉडेल इतर प्रदेशांत राबवावे, असा विचार मूळ धरत गेला. दक्षिण आशियामध्ये प्रादेशिक सहकार्य संघटनेची स्थापना करावी, अशी मागणी 1970 च्या दशकाच्या उत्तरार्धात सुरू झाली होती. या मागणीमागे बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका यांचा पुढाकार होता.

बांगलादेशचे राष्ट्रपती झिया उर रेहमान हे सार्कच्या निर्मितीबाबत फारच आग्रही होते. भारत आणि पाकिस्तान याबाबत सुरुवातीस फारसे उत्सुक नव्हते. भारताला अशी भीती होती की, इतर सर्व सार्क सदस्य एकत्र येऊन भारताला 'कॉर्नर' करतील. आणि पाकिस्तानला असे वाटत होते की, सार्क हा भारताचा पाकिस्तानविरोधी गट बनवण्याचा डाव आहे. पण पुढे दोन्ही देशांनी आपापल्या भूमिका थोड्या लवचिक केल्या आणि सार्कच्या निर्मितीत सहभागी व्हायचे ठरवले. सार्क संघटनेची पहिली शिखर परिषद 8 डिसेंबर 1985 रोजी बांगलादेशाची राजधानी ढाका येथे पार पडली. त्या परिषदेला भारत, पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, भूतान, श्रीलंका, मालदीव हे सात देश हजर होते. या देशांच्या उपस्थितीत सार्कची स्थापना झाली. पुढे अपगानिस्तान सार्कचा सभासद झाला. साउथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कोऑपरेशनची स्थापना संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरच्या कलम 52 अन्वये करण्यात आली आहे,

➢ सार्कच्या स्थापनेला पुरक बाबी (**Supplementary matters to the establishment of SAARC**)

1) सार्कमध्ये सहभागी राष्ट्रांच्या 10000 हजार पूर्विचा वर्षाचा इतिहास व संस्कृतीमध्ये साध्यर्म दिसून येते.
2) भौगोलिक दृष्ट्या दक्षिण आशिया हा एक सलग भू-प्रदेश आहे. ऋतुमान, मातीचा पोत, जीवसृष्टी, यात साध्यर्म दिसते. शेती व पिकांच्या बाबतीतही समानता आढळून येते.
3) दक्षिण आशियातील देशांचे एकमेकांशी प्राचिन काळापासून घनिष्ठ संबंध आहे. किंबहुना इतिहासाच्या

काही कालखंडात हे देश एकाच साम्राज्याचा भाग होते.

4) दक्षिण आशियातील देशांना अनेक समान आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्यांनी ग्रासले आहे. या देशात बेरोजगारी, दारीद्रय विदेशी कर्जाचा बोझा, महागाई या समस्या आहेत.
5) परकीय राजवटीने दक्षिण आशियाच्या प्रतीमध्ये थोडाफार हातभार लावला परंतु त्यापेक्षा या देशांचे आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणात केले.
6) परकीय राजवटीने 19 व्या आणि 20 व्या शतकात दक्षिण आशियाला डच, पोर्तुगीच, फ्रेंच, ब्रिटीश इ. युरोपीय देशांनी व्यापाराच्या नावाखाली या देशात प्रवेश करून या देशाची सत्ता हस्तगत केली.

➢ सार्कच्या स्थापनेची उद्दिष्ट्ये **(Objectives of the establishment of SAARC)**

सार्कच्या जाहीरनाम्यात पुढील उद्दिष्ट्ये सांगण्यात आलेली आहेत.

1) दक्षिण आशियातील लोकांच्या कल्याणास प्रोत्साहन देणे आणि त्यांचे जीवनमान सुधारणे.
2) या प्रदेशातील आर्थिक वाढ, सामाजिक प्रगती, सांस्कृतिक विकासाला गती देण्यासाठी आणि सर्व व्यक्तींना सन्मानाने जगण्याची आणि त्यांच्या क्षमतांचे मूल्यांकन करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
3) दक्षिण आशियातील देशांमध्ये सामूहिक आत्मनिर्भरता वाढवणे आणि मजबूत करणे.
4) एकमेकांच्या समस्यांचे मूल्यांकन करा, परस्पर विश्वास आणि समजूतदारपणा वाढवा.
5) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रात परस्पर सहकार्य आणि सक्रिय सहभागास प्रोत्साहन देणे.
6) इतर विकसनशील देशांसोबत सहकार्य मजबूत करणे.
7) समान हिताच्या बाबींमध्ये आंतरराष्ट्रीय मंचावर परस्पर सहकार्य मजबूत करणे.
8) समान उद्दिष्टे असलेल्या आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संस्थांना सहकार्य करणे.

➢ सार्कची आधारभूत तत्वे **(Fundamentals of SAARC)**

सार्कमधील सहकार्यासाठी आधारभूत अशा खालील तत्वाचाही समावेश करण्यात आलेला आहे.

1) सावैभौम एकता, भौगोलिक एकात्मता, राजकीय स्वातंत्र, राज्याच्या अंतर्गत बाबीमध्ये हस्तक्षेप न करणे आणि परस्पर लाभ या तत्वावर सार्क संघटनेच्या अंतर्गत सहकार्य अवलंबून आहे.
2) हे सहकार्य द्विपक्षिय व बहुपक्षिय सहकार्याला पर्याय नसून पुरक आहे.
3) हे सहकार्य सदस्य राष्ट्रांच्या द्विपक्षिय व बहुपक्षिय कराराच्या सुसंगत राहिल.

➢ सार्क संघटनेचे कार्य क्षेत्र **(Scope of SAARC Organization)**

1) मानव संसाधन विकास आणि पर्यटन
2) कृषी आणि ग्रामीण विकास
3) पर्यावरण, नैसर्गिक आपत्ती आणि जैवतंत्रज्ञान
4) आर्थिक, व्यापार आणि वित्त
5) सामाजिक समस्या
6) माहिती आणि गरीबी निर्मूलन
7) ऊर्जा, वाहतूक विज्ञान आणि तंत्रज्ञान
8) शिक्षण, सुरक्षा आणि संस्कृती आणि इतर

➢ सार्क विशेष संस्था **(SAARC Special Institution)**

सार्क विकास निधी **(SDF)**

- दारीद्रय निर्मूलन, विकास इत्यादीसारख्या सामाजिक क्षेत्रातील सहकार्यावर आधारित प्रकल्पांना वित्तपुरवठा करणे हे त्याचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.
- SDF चे सदस्य देशाच्या वित्त मंत्रालयाच्या प्रतिनिधींचा समावेश असलेल्या मंडळाद्वारे शासित आहे. SDF गव्हर्निंग कौन्सिल ( MSc चे वित्त मंत्री) बोर्डाच्या कामावर देखरेख करते.

दक्षिण आशियाई विद्यापीठ

- दक्षिण आशियाई विद्यापीठ हे भारतात स्थित एक आंतरराष्ट्रीय विद्यापीठ आहे. दक्षिण आशियाई विद्यापीठाने दिलेल्या पदव्या आणि प्रमाणपत्रे राष्ट्रीय विद्यापीठे किंवा संस्थांद्वारे प्रदान केलेल्या संबंधित पदवी आणि प्रमाणपत्रांप्रमाणेच असतात.

दक्षिण आशियाई प्रादेशिक मानक संघटना

- दक्षिण आशियाई प्रादेशिक मानक संघटनेचे सचिवालय ढाका, बांगलादेश येथे आहे.
- मानकीकरण आणि अनुरूपता मूल्यमापन क्षेत्रात SAARC च्या सदस्य देशांमधील समन्वय आणि सहकार्य वाढवण्यासाठी आणि साध्य करण्यासाठी याची स्थापना करण्यात आली. जागतिक बाजारपेठेत प्रवेश आणि आंतर-प्रादेशिक व्यापार सुलभ करण्यासाठी सुसंवादी मानके विकसित करणे हे त्याचे ध्येय आहे.

सार्क लवाद परिषद

- ही पाकिस्तानमध्ये स्थापन झालेली आंतर शासकीय संस्था आहे. हे व्यावसायिक, औद्योगिक, व्यापार, बँकिंग, गुंतवणूक आणि इतर संबंधित विवादांचे न्याय्य आणि कार्यक्षम निराकरण करण्यासाठी कायदेशीर मंच प्रदान करते.

➢ सार्कचे राष्ट्रांचे जागतिक स्तरावरील स्थान **(The global position of SAARC nations)**

सार्क या प्रादेशिक संघटनेमध्ये सहभागी देशांची संख्या 8 असून जागतिक लोकसंख्येच्या 21.3 टक्के लोकसंख्या सार्कमधील देशांची आहे. या राष्ट्रांचे सकल गृह उत्पन्न 1.3 टक्के आहे निर्यातीचे प्रमाण 0.9 टक्के तर आयातीचे प्रमाण 1.0 टक्के आहे. अन्नधान्याचे उत्पादन 9.7 टक्के तर आंतरविभागीय व्यापार 3.4 टक्के इतका आहे.

➢ सार्कची कामगिरी **(SAARC's performance)**

1985 मध्ये स्थापना झाल्यापासून आजपर्यंतच्या कामगिरीतील ठळक बाबी खालीलप्रमाणे सांगता येईल.

1) राजकीय दृष्ट्या अत्यंत स्फोटक परिस्थिती असलेल्या दक्षिण आशियात आणि विकासाच्या विभिन्न टप्प्यावर असलेले देश एकत्र येवून एकमेकांना सहकार्य करीत आहेत.
2) सार्कमध्ये सहभागी देश एकमेकांना भरीव आर्थिक मदत करीत असून व्यापार, वित्तीय क्षेत्र, चलनविषयक क्षेत्रात भरीच कामगिरी केली आहे.
3) शिक्षण, क्रीडा, संस्कृती आणि प्रसार माध्यमे ह्या क्षेत्रात सार्कने भरीव कामगिरी केली आहे. शिक्षण क्षेत्रात दक्षिण आशिया विद्यापीठ दिल्ली येथे सुरू झाले आहे. आणि त्याद्वारे शिष्यवृत्ती देवून दक्षिण आशियासंबंधी विषयावर संशोधनास प्रोत्साहन दिले जाते.
4) विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात दक्षिण आशियाच्या देशांतील सहकार्य फार महत्वाचे आहे.

➢ सार्कच्या अपयशाची कारणे **(Reasons for SAARC failure)**

1) दक्षिण आशिया हा जगातील सर्वात असंघटित प्रदेश आहे, सार्क देशांमधील परस्पर व्यापार त्यांच्या एकूण व्यापाराच्या केवळ 5% आहे.
2) सार्क देशांमधील व्यापाराला चालना देण्यासाठी 2006 मध्ये स्वाक्षरी केलेला दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र ( SAFTA) करार प्रत्यक्षात फारसा यशस्वी झालेला नाही.
3) 2016 मध्ये इस्लामाबाद (पाकिस्तान) येथे होणारी प्रस्तावित 19 वी सार्क परिषद भारताच्या उरी भागात

झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर रद्द करण्यात आली. तेव्हापासून सार्क शिखर परिषद आयोजित करण्यात आलेली नाही.

4) अलिकडच्या वर्षात BIMSTEC मध्ये भारताच्या वाढत्या क्रियाकलापांनंतर, सार्कच्या भविष्यावर प्रश्न उपस्थित केले गेले.
5) तज्ञांच्या मते, भारत-पाकिस्तान संघर्ष हे या गटाच्या अपयशाचे प्रमुख कारण आहे.
6) पाकिस्तान दहशतवादाला आश्रय देतो हे सर्वश्रुत आहे अशा परिस्थितीत पाकिस्तानशी सामान्य व्यापाराला चालना देणे भारतासाठी खूप अवघड आहे, तर पाकिस्तान ज्या गटात भारताला थोडासा फायदा देतो त्या गटातील सर्व प्रस्तावांना विरोध करतो.

➢ सार्कसमोरील आव्हाणे **(Challenges facing SAARC)**

सार्कच्या स्थापनेला तीस वर्ष झाल्यानंतर देखिल या संघटनेची वाटचाल समाधानकारक नाही. सार्कच्या जाहिरनाम्यातील बहुतांश उद्दिष्टे अद्यापही कागदोपत्रीच आहे. सार्कमध्ये सहभागी असलेल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक विषमता दिसून येते. या देषामध्ये दारिद्रय व गरीबीच्या समस्येला तोंड देणा-या लोकांची संख्या करोडोच्या घरामध्ये आहे. 1993 मध्ये सार्क च्या सभेमध्ये गरीबीच्या निमुर्लनासंबंधीचा ठराव केला गेला, त्यानुसार या उपखंडातून 2002 पर्यंत गरीबीचे निमूर्लन करण्याचे उद्दिष्ठ ठरविण्यात आले होते त्यामध्ये यश आले नाही. दळणवळणाच्या अपु-या सोयी व सुविधामुळे आपसी व्यापार करतांना अडथळे येत आहे. कृषीवर आधारीत देश असून सुध्दा कृषी क्षेत्राला अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे. विकसित देशांच्या तुलनेत या देशांतील शेतीची उत्पादकता कमी आहे. लोकसंख्या विस्फोट ही सार्कदेशांसमोरील महत्वाचे आव्हाण आहे. लोकसंख्या वाढ व रोजगाराची कमतरता ह्यामुळे दक्षिण आशिया भागात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर होणा-या व्यापारात भारताचा अपवाद सोडल्यास इतर देशांच्या व्यापाराचे प्रमाण खुप कमी आहे. सार्कचा जागतिक स्तरावरील व्यापारातील वाटा अत्यंत अल्प म्हणजे तीन अब्ज डॉलर इतका आहे. धार्मिक व भाषिक विविधता ही सुध्दा या समुहातील देशांसमोरील महत्वाची समस्या आहे. तसेच पाकिस्तानच्या आडमुठेपणामुळे सार्क या संघटनेला निर्धारीत उद्दिष्टे पूर्ण करण्यात सातत्याने अपयश येत आहे. त्यामुळे बिमस्टेक या प्रादेशिक उपविभागीय संघटनेचे महत्व वाढत आहे. भारत बिमस्टेकच्या माध्यमातून सार्कची उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. भारत आणि पाकिस्तानच्या राजकीय संघर्षमुळे सार्कची वाटचाल कठीण होत चालली आहे.

➢ निष्कर्ष व उपाय **(Conclusions and solutions)**

सार्क ही दक्षिण आशियाई देशांची ऐतिहासिक आणि समकालीन ओळख प्रतिबिंबित करणारी संघटना आहे. जगाच्या एक चतुर्थांश लोकसंख्या सार्क या प्रादेशिक संघटनेमध्ये असलेल्या राष्ट्रांची आहे. या संघटनेमध्ये भारत आणि पाकिस्तान हे दोन महत्वाचे देश आहे. परंतु भारत आणि पाकिस्तान यांचे राजकीय संबंध नेहमीच तणावाचे राहिले आहे. या दोन देशांमध्ये अनेकदा संघर्ष उभारून आला आहे. त्यामुळे युरोपियन संघाच्या तुलनेत सार्कचा जागतिक स्तरावरील प्रभाव कमी आहे. या दोन देशांच्या आपसी वादामुळे सार्कच्या परीषदेचे नियमित आयोजन होत नाही. त्यामुळे सार्क ही संघटना उद्दिष्टपुर्तीपासून खुप दुर जात आहे. त्यामुळे सार्कच्या नियमित परिषदेचे आयोजन होणे आवश्यक आहे. तसेच सार्कच्या सदस्य देशांमध्ये अधिक सामजस्य करार करण्याची गरज आहे. सार्कमध्ये सहभागी देशांनी आपासामध्ये व्यापार करण्याच्या धोरणाला प्राध्यान्य दिले पाहिजे. माहिती, तंत्रज्ञान आणि दळणवळणासारख्या सुविधा मध्ये एकमेंकांना सहकार्य केले पाहिजे. भारत आणि पाकिस्तान या देशांनी आपसातील हेवे-दावे विसरून सार्कमधील सर्व सदस्य राष्ट्रांचा विकास होईल असे सहकार्य केले पाहिजे. सार्कमधील सहभागी देशांमध्ये कोणताही वादविवाद निर्माण झाल्यास विचारविनिमयाच्या माध्यमातून त्यावर तोडगा काढला पाहिजे. दारिद्रय, गरीबी, निमुर्लनासाठी धोरण ठरविले पाहिजे. कृषी विकास, लोकसंख्या विस्फोट, बेरोजगारी

आणि वाढता दहशतवाद यावर एकत्रीत येवून मार्ग काढण्यासाठी सामुहिक प्रयत्न केले पाहिजे.

➢ संदर्भसुची


1) भारतीय अर्थव्यवस्था : प्रा. बी. एल. जिभकाटे/डॉ. सुधाकर शास्त्री, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रिब्यूटर्स, नागपूर.
2) भारतीय अर्थव्यवस्था : रुद्र दत्त/के.पी.एम. सुन्दरम, एस.चन्द.एण्ड कम्पनी लि. रामनाग,नई दिल्ली.
3) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र : डॉ. एस.व्ही. ढमढेरे/ डॉ. संजय तुपे, डॉयमंड पब्लिकेशन्स पुणे.
4) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र : एम.सी. वैष्य Oxford & Ibh Publishing
5) आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र : के.सी.वर्मा / के.एल.राणा, विशाल पब्लिशिंग कंपनी.
6) भारत आणि जग : डॉ. शैलेंद्र देवळानकर
7) भारत की विदेश निती : डॉ. महेश भटनागर, लक्ष्मी बुक डेपो, भिवानी
8) भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पुनीविचार: राजीव सीकरी, सागे पब्लीकेशन्स प्रा. लिमीटेड
9) भारत व सार्क : विलास आवारी (संशोधन ग्रंथ)
10) Saarc: Origin Growth & Failure: E Sudhakar, Gyan Publishing House, New Delhi.
11) India and Saarc : O.P.Goyal, Isha Books, New Delhi.
12) Saarc & South Asian Economic Union : Dr. Surendar Singh,K.K. Publications, Daryaganj, New Delhi
13) वर्तमानपत्रे: लोकमत,लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ.
14) www.google.com